I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): नांदेड    P.S. (पोलीस ठाणे): भाग्य नगर    Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0303    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 07/06/2026 00:54 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): शनिवार    Date from (दिनांक पासून): 06/06/2026    Date To (दिनांक पर्यंत): 06/06/2026

Time Period (कालावधी): प्रहर ५    Time From (वेळेपासून): 12:20 तास    Time To (वेळेपर्यंत): 14:20 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):    Date (दिनांक): 07/06/2026    Time (वेळ): 00:08 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):    Entry No. (नोंद क्र.): 002    Date and Time (दिनांक आणि वेळ): 07/06/2026 00:08 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): उत्तर, 2 कि.मी.    Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): जैन मंदीर स्टॅन्ड माउली, मेडीकल जवळ गुळाचा, चहाच्या दुकानावर नांदेड,

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): अर्चना वैजनाथ करपुडे पोलीस निरीक्षक

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1987

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभागनांदेड, भाग्य नगर, नांदेड, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभागनांदेड, भाग्य नगर, नांदेड, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-8087343862

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | गौंविद लक्ष्मण वाघ | | | 1. Town/Village (शहर / गाव): नाळेश्वर ताजि नांदेड,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): भाग्य नगर,District (जिल्हा): नांदेड,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. Total value of property (In Rs/-) मालमतेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

फिर्याद　　　　　　　　　　दिनांक 06/06/2026

मी अर्चना वैजनाथ करपुडे, वय39 वर्षे व्यवसाय नौकरी, पद पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 8087343862

सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील 01 वर्षापासून कार्यरत आहे.

दिनांक 06/06/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथील पोलीस उप अधीक्षक श्री राहुल तरकसे यांनी आम्हास ला.प्र.वि कार्यालयात बोलावून कळविले की, तक्रारदार कपील अशोक नुगुरवार रा. कॅप्टन निवास, मीरानगर, पडेगाव ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांची लाच मागणीची तक्रार आहे. आपण त्यांची तक्रारीची शहानिशा करून तक्रार नोंदवून पुढील योग्य ती कार्यवाही करावी असे आदेशीत केले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना त्यांचे तक्रारी संबंधाने विचारणा करता त्यांनी कळविले की, मी वरील प्रमाणे राहणार असुन मी मुळ रहिवाशी नांदेड येथील आहे. माझे मुलीचे शिक्षणाकरीता मी छत्रपती संभाजीनगर येथे राहत आहे. नांदेड येथील माझे घर प्रेमनगर मालेगाव रोड तरोडा खु.ता.जि.नांदेड आहे. सदरचे घर हे चार वर्षा पासुन भाडयाने दिलेले आहे.

दिनांक 21/02/2026 ते 14/03/2026 या दरम्याण आम्ही विद्युत महावितरण कार्यालय नांदेड यांना लाईट बिल जास्त आल्याबाबत तक्रारी कंझुमर पोर्टल वर केल्या होत्या. त्यांनतर दिनांक 14/03/2026 रोजी महावितरण येथील कर्मचारी हे माझ्या भाडयाने दिलेल्या घरी आले व माझे भाडेकरू शुभम नितीन जोशी यांना म्हणाले की मी महावितरण येथील कर्मचारी आहे. व आमच्या साहेबाकडे बिला बाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तुमच्या तक्रारी बाबत मला तुमच्या घर मालकाला बोलायचे आहे. तुम्ही त्यांना फोन लावा. तेव्हा जोशी यांनी मोबाईल वरून मला कॉल करून विद्युत महावितरण कार्यालयातील कर्मचारी बोलतो असे म्हणुन तुमच्या तक्रारी आमच्या साहेबाकडे प्राप्त झाल्या आहे तुमचे बिल कमी करायचे असेल तर मला बिलाच्या 50 टक्के रक्कम दयावी लागेल. मग तुम्हाला आमचे साहेब बिल कमी करून देतील त्यावर मी म्हणालो तुमचे नाव काय आहे ते सांगा विद्युत महावितरण कार्यालय येथील आलेले कर्मचारी म्हणाले की तुम्हाला माझ्या नावावरून काय करायचे आहे. तेव्हा मी म्हणालो ठिक आहे तुमचे नाव नका सांगु मी काही तुम्हाला पैसे देणार नाही आम्ही तुमची पैसे मागीतल्या बाबत तक्रार करू तेव्हा महावितरण कार्यालयातील कर्मचारी म्हणाले की तुम्हाला कुठे तक्रार करायची ते करा व बिल भरत बसा असे बोलून निघुन गेला.

त्यानंतर दिनांक 31/05/2026 रोजी विद्युत महावितरण कार्यालय, नांदेड येथील कर्मचारी गोविंद लक्ष्मण वाघ यांचा कॉल आला आणि म्हणाले की, मी गोविंद वाघ महावितरण कंपनीचा कर्मचारी बोलतो. तुमच्या घरी मी मार्चमध्ये आलो होतो. तुमच्या भाडेकरूच्या फोनवरून बिलाबाबत बोललो होतो.

दिनांक 31/05/2026 रोजी मला विद्युत महावितरण कार्यालय नांदेड येथील कर्मचारी गोविंद लक्ष्मण वाघ यांचा कॉल आला आणि म्हणाले की, तुमच्या नावावर असलेले मिटर क्रमांक 550013378312 या क्रमांकाचे मिटर खराब झाले आहे. ते बदलावे लागेल त्या साठी एक हजार रूपये खर्च येतो असे सांगिल्यावर मी त्यांना दिनांक 31/05/2026 रोजी गोविंद वाघ यांच्या मोबाईलवर फोन पे व्दारे एक हजार रूपये पाठविले.

त्यांनतर पुन्हा मला दिनांक 01/06/2026 रोजी गोविंद वाघ यांचा फोन आला आणि सांगितले की आपले जुने मिटर बदलुन नवीन मिटर बसवले आहे. परंतु चालु रिडींग व बिल भरलेली रिंडीग या मध्ये साधारन दोन हजार युनिटचा फरक आहे. त्यामुळे तुम्हाला 30,000/- रू बिल भराये लागेल. जर तुमचे तीस हजार रूपये वाचवायचे असेल तर मला 50 टक्के रक्कम दया मी साहेबांना सागून जिरो रिंडीग करून देतो असे मला सांगितले तेव्हा मी त्यांना सांगितले की, साहेब मी छ.संभाजीनगर

येथे आहे नांदेड येथे आल्यावर तुम्हाला भेटतो.

विद्युत महावितरण येथील कर्मचारी गोविंद वाघ हे मागत असलेले पैसे हे लाच असल्याची मला खात्री झाली. परंतु मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही म्हणुन मी ला.प्र.वि कार्यालय नांदेड येथे येवून तक्रार केली माझा व त्यांचा कोणताही पैसे देण्याघेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही त्यांची व माझी पुर्व दुष्मनी नाही. मी गोविंद वाघ यांना भेटण्याकरीता आज दिनांक 06/06/2026 रोजी जाणार आहे.

तरी विद्युत महावितरण कार्यालयातील गोविंद वाघ यांची मी आज भेट घेण्यासाठी जाणार असुन त्यावेळी त्यांनी माझ्याकडे वर नमुद कामाकरीता लाचेची मागणी करुन स्वतः किंवा इतरांमार्फत स्विकारल्यास त्यांच्याविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी त्याअनुशगांने त्यांनी सविस्तर स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार नोंदवून घेतलेली आहे.

त्यानंतर आम्ही मा. प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड यांना पत्र देवून पंच क्र. 01 रवि रमेश सानप व्यवसाय नौकरी, पद. लिपीक टंकलेखक ने. प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड व पचं क्रं. 2 दिलीप लिगूराम गाडचेलवार व्यवसाय नोकरी पद वरिष्ठ लिपीक ने. प्रादेषिक परिवहन कार्यालय नांदेड असे दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले. सापळा पथकातील सदस्य पोहेकाॅ/जगन्नाथ अनंतवार, पोकाॅ/ईश्वर जाधव, पोकाॅ/श्याम गोरपल्ले व दोन्ही शासकीय पंचाची एकमेकांना ओळख करून दिली. त्यांनतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार दोन्ही पंचा समक्ष तोंडी कथन केली तक्रारदार यांनी त्यांच्या हस्ताक्षरात दिलेली तक्रार व तोडी कथन केलेली तक्रार सारखीच असल्याची खात्री करून दोन्ही पंच यांनी त्यावर स्वाक्षरी केली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकाॅ/श्याम गोरपल्ले यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यांनतर पोकाॅ/गोरपल्ले यांनी आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर आंम्ही तक्रारदार कपील अशोक नुगुरवार यांना दोन्ही पंचा समक्ष विद्युत महावितरण कार्यालयातील कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ हे कुठे भेटतील या बाबत विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार यांनी विद्युत महावितरण कार्यालय मध्ये कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांना फोन लावुन विचारपुस करतो असे म्हणाले. आमच्या सुचनेवरून पोकाॅ/श्याम गोरपल्ले यांनी डिजिटल व्हाईस रेकाॅर्डर 12:03 वाजता चालू करून तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांक 8087568654 वरुन विद्युत महावितरण कार्यालयातील कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांचे मोबाईल क्रमांक 7507517541 वर फोन केला असता त्यांनी फोन उचलला. तेव्हा तक्रारदार कपील नुगुरवार यांनी सर मी नुगुरवार बोलतो आलो होतो नांदेड ला" असे म्हणाले असता, तेव्हा विद्युत महावितरण कार्यालयाचे कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांनी सांगितले की, आता "तुम्ही कुठे आहेत. तेव्हा तक्रारदार म्हणाले मी स्टेशन ला आहे. कुठे येवू तेव्हा विद्युत महावितरण कार्यालयातील कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ म्हणाले या घराकडे या तेव्हा तक्रारदार म्हणाले की कुठे प्रेमनगर येथे माझे घरी तेव्हा गोविंद वाघ म्हणाले की हो असे बोलून फोन ठेवला.

तेव्हा आम्ही तक्रारदार यांना लाच पडताळणी कारवाईसाठी पाठविण्याचा निर्णय घेवून सोबत पोकाॅ/श्याम गोरपल्ले व पोकाॅ/ ईश्वर जाधव हे त्यांच्या मोटार सायकल ने व तक्रारदार व पंच क्र. 1 हे दुस-या मोटार सायकलने प्रेमनगर जवळ जावून वेळ 12:30 वाजता डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर

चालु करून तक्रारदार यांचे गळयात लटकावुन देवून तक्रारदार व पंच क्र. 01 रवि रमेश सानप यांना महावितरण कार्यालयातील खाजगी ईसम गोविंद वाघ यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे घर प्रेम नगर नांदेड येथे रवाना केले. थोडया वेळाने 12;59 वाजता तक्रारदार व पंच क्र. 01 असे पोका ॅ/गोरपल्ले यांच्या जवळ परत आले तेव्हा त्यांनी व्हाईस रेकाॅर्डर बंद केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 असे सर्व ला.प्र.वि कार्यालय येथे परत आले.

त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, महावितरण कार्यालयातील कामकाज करणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांना मी हे माझे घरा जवळ गेल्यानंतर काॅल करून बोलावून घेतले तेव्हा त्यांनी मला म्हणाले की तुम्हचे मिटरवर रिडींग जास्त आहे. व आता कस करायच तुम्ही सांगा.. तुम्हाला आता जर ही रेंडींग जर टाकायची असले तर तुम्हाला लई बिल भराव लागते 35 - 40 हजार रुपये बिल येते ,,,,,हे बघा 2900 म्हणजे समजा स्वतः हे 700 युनिट जर धरल तर तुम्ही हे 700 युनिट जर मायनस,,,,,,,, केले 2900 मधुन 2200 युनिट देते तुम्हला, 2200 युनिट मया मते..2200 गुनिले 15 रुपये रेट लागते 33 हजार रुपये बिल येते,, आता हे, तुम्हाला साॅल करायच का ? बिल आणायच हेच तुम्हाला इचारु लागलो...50 टक्के करुन टाका, 50 टक्के माफ होतात.. 30 हजारात 50 टक्के देवून टाका हा मी. तुमच सगळ साॅल करुन टाकतो. तुम्हाला 2... दोन - तिनशे रुपये बिल येते. सगळ आल ते आता. मिटर तुमच काडी राहो काही राहो सगळ आल मजाकड मंग त्याच्यात भरलेली पावती बिवते काही येणार नाही. असे म्हणुन महावितरण कार्यालयातील कामकाज करणारे गोविंद वाघ यांनी सांगितले की साहेबाला कराव लागते कुडाप साहेबाला,,,,,, हे गोष्टी कराव लागत. त्यानंतर तक्रारदार म्हणाले आता हे 15 हजार रुपये थोडे जास्त होतील थोडेफार काहीतरी कमी करा. माझेकडे तेवढे पैसे नाही मी तुम्हाला आज 5000/- रू देतो व उरर्वरित 8000/- रू दोन दिवसानंतर देतो असेे बोलून लाचेची मागणी करून तडजोडी अंती13000/-रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचे ठरले.

तक्रारदार यांनी त्यांचे जवळील 5,000/- रुपये रक्कम (ज्यात पाचशे रुपये दराच्या 10 भारतीय चलनी नोटा पंचासमक्ष हजर केल्या. पोकाॅ/ईश्वर जाधव यांनी लाच रक्कम 5000/- रूपये रकमेच्या भारतीय चलनी नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे पॅटच्या उजव्या खिशात अलगद ठेवून दिले.

त्यानंतर तक्रारदार यांनी महावितरण कार्यालय येथील कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांची भेट घेण्यासाठी त्यांचे गळयात 13.50 वाजता डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर चालू करून गळयात अडकावून पंच क्र. 1 रवि रमेश सानप यांच्यसोबत तक्रारदार यांचे घराजवळ जैन मंदीर कमान येथे रवाना केले. त्यानंतर त्यांच्या पाठोपाठ आम्ही व सापळा पथक त्यांच्यावर नजर ठेवून त्यांच्या मागे मागे गेलो. तक्रारदार हे जैन मंदीर स्टाॅप जवळ गुळाचा चहाच्या दुकानवर बसले त्यांच्या आजू बाजूस सर्व सापळा पथक थांबून महावितरण कार्यालय येथील कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ हे येण्याची वाट पाहिली व थोडया वेळात गोविंद वाघ हे तक्रारदार यांच्या जवळ आले.

त्यानंतर तक्रारदार हे 14.20 वाजता महावितरण कार्यालय येथील कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांनी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर आम्ही व सापळा पथक तात्काळ

जैन मंदीर स्टाॅप जवळील गुळाची चहाच्या दुकानात जावून महावितरण कार्यालय येथील कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांच्या जवळ जावून आम्ही त्यांना आमचा परिचय देवून त्यांच्यावर अँन्टी करप्षनची कारवाई झाल्याचे कळविले. तेव्हा आम्ही पंच क्र. 2 यांना महावितरण कार्यालय येथील कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांनी पॅंट खिषात ठेवलेली अँन्थ्राॅसिन पावडरयुक्त 5000/- रूपये लाचेची रक्कम मिळून आल्याचे दाखवून ती हस्तगत केली. त्यानंतर महावितरण कार्यालय येथील कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांना ताब्यात घेवुन सापळा पथकासह ला.प्र.वि कार्यालय येथे हजर आलो.

तरी तक्रारदार कपील अशोक नुगुरवार रा. कॅप्टन निवास, मीरानगर, पडेगाव ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांनी आज दिनांक 06/06/2026 रोजी 12.30 ते 12.49 वाजण्याचे दरम्यान तक्रारदार यांचे घर प्रेम नगर येथे शासकीय पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान विद्युत महावितरण कार्यालयात काम करणारा खाजगी ईसम गोविंद लक्ष्मण वाघ, वय 32 वर्शे, व्यवसाय विद्युत महावितरण कंपनीचे मिटर बदलने रा. नाळेष्वर ता.जि नांदेड यांनी तक्रारदार यांचे घर प्रेम नगर येथील मिटर ग्राहक क्रमांक 550013378312 यांचे चालु रिडींग व बिल भरलेली रिंडीग या मध्ये साधारन दोन हजार युनिटचा फरक आहे. त्यामुळे तुम्हाला 30,000/- रू बिल भरावे लागेल. जर तुमचे बिल माफ करायचे असेल तर मला 15000/- रू दया मी साहेबांना सागून झिरो रिंडीग करून देतो असे मला 13000/- रू लाचेची मागणी करून तडजोडी अंती आज 5000/-रुपये दया व उरर्वरित 8000/- रू दोन दिवसात दया असे लाच रक्कम स्विकारण्याची संमती दिली.

वेळ 13.50 ते 14.20 वाजण्याचे दरम्यान जैन मंदीर स्टाॅप जवळ गुळाचा चहा या दुकानात तक्रारदार कपील अषोक नुगुरवार यांनी महावितरण कार्यालयत कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांना म्हणाले की,,,, तुम्ही सांगीतल्या प्रमाणे 5000/- रू आहेत. 500/- रू च्या दहा नोटा आहेत मोजून घ्या ,,,,,, असे म्हणाले व माझे काम लवकर करून दया तेव्हा महावितरण कार्यालयातील कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ म्हणाले की राहिलेले पैसे सोमवार मंगळवार दया ,,,,, असे बोलून 5000/- रूपये लाच रक्कम दिले. त्यांनतर महावितरण कार्यालयत कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांनी 5000/- रूपये लाच रक्कम स्विकारली. महावितरण कार्यालयत कामकरणारे खाजगी ईसम गोविंद वाघ यांनी तक्रारदार यांचे घराचे मिटर वरील रिडींग झिरो करून बिल माफ करून देतो म्हणुन स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी साहेबाना दयावे लागते असे म्हणुन साहेबांच्या नावाचा प्रभाव पाडून लाचेची मागणी करून अँन्थ्रासिनयुक्त लाचेची रक्कम 5000/- रूपये स्वतःलाच स्विकारली आहे. म्हणून माझी गोविंद लक्ष्मण वाघ वय 32 वर्षे व्यवसाय महावितरण कार्यालयात काम करणारे खाजगी ईसम रा.नाळेष्वर ता.जि.नांदेड यांचे विरुध्द कलम 7 अ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेषिर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही